**<u>नवी मुंबई महानगरपालिका</u>**
**<u>महापालिका सर्वसाधारण सभा</u>**

महानगरपालिकेच्या बुधवार, दिनांक 21/09/2016 रोजी भरलेल्या माहे सप्टेंबर महिन्याच्या सर्वसाधारण सभेत मंजूर/नामंजूर इ. ठरावाची माहिती संक्षिप्त आणि मसुदा स्वरुपात खालीलप्रमाणे आहे. :-

| | |
|---|---|
| विषय क्र. 02.<br>दिनांक 02 सप्टेंबर 2016 | प्रश्नोत्तरे |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |
| विषय क्र. 03.<br>दिनांक 02 सप्टेंबर 2016 | नमुंमपाच्या विविध विभागांकरीता डेटा लिझलाईन अद्‌यावत करण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/08/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/का.अ.वि-1/556/2016. |
| ठराव क्र. 1210.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "नवी मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांकरीता डेटा लिझलाईन अद्‌यावत करणय़ाच्या कामासंबंधातील प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह एकूण रक्कम रु. 37 लाख, 14 हजार, 500 मात्र इतक्या खर्चास, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजूरी देण्यात यावी" |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |
| विषय क्र. 04.<br>दिनांक 02 सप्टेंबर 2016 | सन 2016-2017 सालाकरीता औषधे खरेदी करणेकरीता प्रशासकीय मान्यता मिळण्याच्या प्रस्तावाबाबत, आयुक्तांचे दिनांक 10/08/2016 चे पत्र क्र. नमुंमपा/आरोग्य/5275/2016. |
| ठराव क्र. 1211.<br>दिनांक 21 सप्टेंबर 2016 | "सन 2016-2017 सालाकरीता नवी मुंबई महानगरपालिका अंतर्गत सर्व रुग्णालयांकरीता आवश्यक असलेली औषधे खरेदीकरीता निविदा प्रक्रिया करणेस/जनऔषधी योजनेअंतर्गत निविदेतील दरांपेक्षा कमी दराने उपलब्ध औषधे/सर्जिकल साहित्य खरेदी करण्यास, अपेक्षित खर्च रु. 6 कोटी, 81 लक्ष, 81 हजार, 086 मात्र इतक्या खर्चास, प्रस्तावात नमूद करण्यात आलेल्या बाबींसह, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 73 अन्वये, सुचविल्याप्रमाणे, प्रशासकीय मंजूरी देण्यात यावी" |
| निर्णय - | <u>मंजूर</u> |

सही/-
(चित्रा बाविस्कर)
महानगरपालिका सचिव,
नवी मुंबई महानगरपालिका

<u>महानगरपालिकेने मंजूर केलेल्या आणि उचित कार्यवाहीसाठी पाठविलेल्या ठरावांची यादी</u>

माहे सप्टेंबर 2016 महिन्याची तहकूब सभा

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 1. | श्री. जयवंत दत्तात्रेय सुतार, यांजकडून :-<br>प्र. क्र. 81, शिरवणे मधील लघुउद्योग भागामध्ये कामधेनू इमारती पासून दिव्या अपार्टमेंट पर्यत "गणेश मंदिरा मार्ग" पश्चिम बाजूला गटर व पदपथाचे बांधकाम करणे. | 04<br>सप्टेंबर | 1212<br>21/09/2016 | मंजूर |
| 2. | श्री. जयवंत दत्तात्रेय सुतार, यांजकडून :-<br>प्र. क्र. 81, शिरवणे जुईनगर रेल्वे स्टेशन पासून कपीश बिल्डर्स मटेरियल शोरुम पर्यत रस्त्यावर पावसाळी पाणी साचल्याने दरवर्षी रस्ता नादुरुस्त होतो. तरी सदर रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे | 05<br>सप्टेंबर | 1213<br>21/09/2016 | मंजूर |
| 3. | श्री. जयवंत दत्तात्रेय सुतार, यांजकडून :-<br>प्र. क्र. 81, शिरवणे मध्ये एम.आर.एफ शोरुम ते जुईनगर रेल्वे स्टेशन पर्यत मुख्य गटर आहे. सदर गटारामध्ये शिरवणे गांव गांवठाण, नेरुळ सेक्टर-1 परिसरातील सांडपाणी जात असते. सदर नाला हा सिडकोने बांधकाम केल्यापासुन केला नाही, तरी सदर भागातील आर.सी.सी. गटर बांधकाम करणे. | 06<br>सप्टेंबर | 1214<br>21/09/2016 | मंजूर |
| 4. | श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-<br>प्र. क्र. 12, सेक्टर-1 मधील गणेश बाग सोसायटी मधील जे दोन धोकादायक रो-हाऊस आहेत. त्यावर कार्यवाही करणेचा ठराव गेल्या महासभेत पास करण्यात आला होता. परंतू अद्‌याप त्या धोकादायक रो-हाऊवरस कार्यवाही झाला नाही. तरी सदर धोकादायक रो-हाऊसवर कार्यवाही करणे. | 07<br>सप्टेंबर | 1215<br>21/09/2016 | मंजूर |
| 5. | श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-<br>प्र. क्र. 12, सेक्टर-2 या ठिकाणी जे रस्ते आहेत. त्या रस्त्याच्या बाजूने नागरीकांना व्यवस्थित चालता यावे यासाठी पर्यायी पादचारी फुटपाथ तयार करुन देणे. | 08<br>सप्टेंबर | 1216<br>21/09/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 6. | श्री. संजू आधार वाडे, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 12, सेक्टर-1 मधील असलेले जनता मार्केट लगत असलेले गार्डन व ज्ञानदीप विद्या मंदिर शाळेमागील असलेल्या गार्डनचे सुशोभिकरण करणे तसेच गार्डनमध्ये वृक्षांची लागवड करणे. | 09<br><br>सप्टेंबर | 1217<br><br>21/09/2016 | मंजूर |
| 7. | श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 83, जुईनगर येथील रस्ता दुभाजकांत व ठिकठिकाणी छोटी छोटी रंगीबेरंगी शोभेची झाडे लावून प्रभागाचे सुशोभिकरण करणे. | 13<br><br>सप्टेंबर | 1218<br><br>21/09/2016 | मंजूर |
| 8. | श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 83, जुईनगर येथील काही सोसायटयांना कचरा पेटया देणे आहे त्या ताबडतोब देणे. | 14<br><br>सप्टेंबर | 1219<br><br>21/09/2016 | मंजूर |
| 9. | श्रीम. तनुजा श्रीधर मढवी, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 83, जुईनगर येथील मराठी शाळा क्र. 17 ते हरीओम मंदिरासमोरील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | 15<br><br>सप्टेंबर | 1220<br><br>21/09/2016 | मंजूर |
| 10. | श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 55, कापेरखैरणे, सेक्टर-11 येथुन एक मोठा नाला वाहतो. सदर नाला रेल्वे लाईन पासून रिलायन्स फ्रेश जवळील पुलापर्यंत पुणपणे स्लॅब टाकून कॉंक्रिटीकरण करुन घ्यावे. त्यामुळे फार मोठी मोकळी जागा उपलब्ध होईल. सदर जागेचा उपयोग या भागात भाजी मार्केटसाठी अथवा पे ॲण्ड पार्क साठी उपलग्ध करुन घ्यावी किंवा या भागात पब्लिक गार्डन ही डेव्हलप होवू शकतो. प्रथमदर्शनी खर्च मोठा असला तरी त्यापासून एक मोठा प्लॉट नगरपालिकेस उपलब्ध होईल, व त्याचा फायदा सर्वांनाच होवून या भागातील लोकांची प्रदुषणापासून कायमची मुक्तता मिळेल. यामध्ये पूणे लक्ष घालून पूर्ण अभ्यास करुन हे काम पुर्णत्वास नेल्यास पालिकेस मोठा प्लॉट मिळेल व उत्पनाचे साधनही होईल. | 16<br><br>सप्टेंबर | 1221<br><br>21/09/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 11. | श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 55, कापेरखैरणे, सेक्टर-11 येथुन एक मोठा नाला वाहतो. त्यातून MIDC चे प्रदुषण युक्त पाणी 12 महिने वाहत असते. या नाल्याच्या बाजूने वाटचालीसाठी एक रस्ता बनवलेला आहे. या रोडच्या दोन्ही बाजूने काही जागा आहे. या जागेत दोन्ही बाजूने लांब असे गार्डन विकसित करावे. तसेच ठराविक अंतरावर बाकडे लावणे. | 17<br>सप्टेंबर | 1222<br>21/09/2016 | मंजूर |
| 12. | श्री. मुनावर पटेल, यांजकडून :-<br><br>प्रभाग क्र. 55, कापेरखैरणे, मध्ये जॉगिंग ट्रॅक तसेच रेल्वे लाईन ते रिलायन्स फ्रेश पर्यत नाल्याच्या बाजूने प्लॅटेशन केलेले आहे. सेक्टर-11 मध्ये जेथे प्लॅटेशन झाले आहे. त्यास संरक्षण जाळी लावण्यात यावी. रिलायन्स फ्रेश आतील रस्त्यावरही प्लॅटेशन झालेली आहे. त्यासही संरक्षण जाळी लावण्यात. | 18<br>सप्टेंबर | 1223<br>21/09/2016 | मंजूर |
| 13. | श्री. रमेश चंद्रकांत डोळे, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 26 महापे, मधील अडवली-भुतवली गावातील पाण्याची टाकी ते मुख्य रस्त्यापर्यत जुने बंदिस्त गटारे आहे. या गटारांची अत्यंत दुरावस्था झाली आहे. ही गटारे रस्त्यालगत असल्याने गटारातील घाण पाणी रस्त्यावरुन वाहत जाते. तसेच पाण्याची टाकी ते नरेंद्र खुलात चाळ येथे उघडे जुने गटार आहे व त्याची दुरावस्था झाली आहे. तरी या दोन्ही ठिकाणची गटारे हेवी डयुटी गटार बांधण्यात यावी. तसेच गंगाराम घाटाळ चाळ ते हावली बाई वरठे चाळ पर्यत जुने उघडे गटार आहे, या गटाराची अत्यंत दुरावस्था झाली असून नवीन हेवी डयुटी गटार बांधणे. | 19<br>सप्टेंबर | 1224<br>21/09/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 14. | श्री. रविंद्र उध्दव इथापे, यांजकडून:-<br><br>नवी मुंबई महानगरपालिका विविध समारंभ आयोजनाबाबत प्रचलित नियमावली बाबतच्या महानगरपालिकेच्या माहे फेब्रुवारी 2013 चा ठराव क्रमांक 121 अन्वये घेतलेल्या निर्णयाचा महानगरपालिका याद्वारे फेरविचार करीत आहे | 20<br>सप्टेंबर | 1225<br>21/09/2016 | मंजूर |
| | नवी मुंबई महानगरपालिका विविध समारंभ आयोजनाबाबतच्या प्रचलित नियमावलीतील बाब क्रमांक 1 ते 4 यापैकी बाब क्रमांक 2 ते 4 मध्ये प्रस्तावित केल्यानुसार मा.महापौर व मा.आयुक्त या ऐवजी मा.महापौर यांचे मार्गदर्शनानुसार निमंत्रणपत्रिका मसूदा जनसंपर्क विभागांमार्फत तयार करण्यात यावा या बदलासह आयुक्तांच्या मुळ प्रस्तावास सूचविल्याप्रमाणे मंजूरी देण्यात यावी | | 1226<br>21/09/2016 | मंजूर<br>(उपसुचनेसह) |
| 15. | श्रीम. रुपाली किस्मत भगत :-<br><br>प्र. क्र. 96, नेरुळ, सेक्टर- 16A, 16 व 18 येथील जुन्या व गंजलेल्या जलवाहिन्याच्या जागी नवीन मोठया व्यासाच्या जलवाहिन्या टाकणे. | 21<br>सप्टेंबर | 1227<br>21/09/2016 | मंजूर |
| 16. | श्रीम. रुपाली किस्मत भगत :-<br><br>प्र. क्र. 96, नेरुळ, सेक्टर- 16A, येथील प्रथमेश सोसायटी प्लॉट नं. 192 आणि आशिर्वाद सोसायटी, प्लॉट नं. 194, यांच्या पाठीमागे प्रस्तावित असलेला रस्ता बनविणे. | 22<br>सप्टेंबर | 1228<br>21/09/2016 | मंजूर |
| 17. | श्रीम. रुपाली किस्मत भगत :-<br><br>. 96, नेरुळ, सेक्टर- 16A, मधील नवी मुंबई महानगरपालिका अतिक्रमण विभागाने अतिक्रमण हटवून मोकळा केलेल्या भुखंड क्र. 69A वरती भविष्यात पुन्हा अतिक्रमण होऊ नये म्हणून सदर भुखंडाच्या चारही बाजूस संरक्षक भिंत बांधणे. | 23<br>सप्टेंबर | 1229<br>21/09/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 18. | श्रीम. मंदाकिनी रमाकांत म्हात्रे, यांजकडून :- ठाणे-बेलापूर रेल्वे सुरु झाली, रबाळे स्टेशन जिथे निर्माण झालेला आहे, ती जागा गोठिवली ग्रामस्थांची होती, त्यामुळे गोठिवली गावातील ग्रामस्थांची अस्मिता त्याठिकाणी राहिली आहे, त्यामुळे सदरहू रेल्वे स्टेशन चे नाव बदलून रबाळे-गोठिवली ठेवण्याबाबत मी ठराव मांडत आहे. सदरहूचा ठराव मंजूर झाल्यानंतर सन्मा. रेल्वे मंत्री व स्थानिक खासदार यांच्या कडे कार्यवाहीसाठी पाठविणे. | 26<br>सप्टेंबर | 1230<br>21/09/2016 | मंजूर |
| 19. | श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :- नवी मुंबई शहरात प्रवेश करताना चार प्रवेशव्दार आहेत. त्या प्रवेशव्दारातुन हजारो लोक नवी मुंबईत ये-जा करत असतात. त्या प्रवेशव्दारावर भंगाराची दुकाने, पान टपाऱ्या, गॅरेज, टायरची व मटन दुकाने असल्यामुळे नवी मुंबई शहराच्या सौंदर्याला बाधा येत असल्याने ती सर्व दुकाने व टपऱ्या तातकाळ हटविणे. | 27<br>सप्टेंबर | 1231<br>21/09/2016 | मंजूर |
| 20. | श्री. किशोर अशोक पाटकर, यांजकडून :- नवी मुंबई महानगरपालिका हददीतील मुख्य रस्त्यालगतच्या असोसिएशन/सोसायटयांनी आपल्या इमारतींना रंगरंगोटी (Painting) केलेली नाहीत. तसेच त्यांनी अनधिकृतपणे होर्डीग्ज लावलेले आहेत. या सर्वामुळे शहराच्या सौंदर्याला बाधा येत असल्याने तातडीने असोशिएन/सोसांयटयांची रंगरंगोटी करण्यात यावी व अनधिकृत होर्डींज काढणे. | 28<br>सप्टेंबर | 1232<br>21/09/2016 | मंजूर |
| 21. | श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :- प्र. क्र. 47 मधील सिव्हरेज लाईन (मलनि:स्सारण वाहीन्या) बदलणे. | 31<br>सप्टेंबर | 1233<br>21/09/2016 | मंजूर |
| 22. | श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :- प्र. क्र. 47 मधील कै. अण्णा साहेब पाटील उद्यानाचे सुशोभिकरण करणे. | 32<br>सप्टेंबर | 1234<br>21/09/2016 | मंजूर |
| 23. | श्रीम. लता भालचंद्र मढवी, यांजकडून :- प्र. क्र. 47 मधील स्ट्रीट लाईट नव्याने बदलणे. | 33<br>सप्टेंबर | 1235<br>21/09/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 24. | श्रीम. मीरा संजय पाटील, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 90, नेरुळ, सेक्टर-09 येथील महाकाली झेरॉक्स सेंटर पासून वारणा दुध डेअरी पर्यंतचे पदपथ खराब अवस्थेत असून पदपथाची सुधारणा करणे. | 35<br>सप्टेंबर | 1236<br>21/09/2016 | मंजूर |
| 25. | श्रीम. मीरा संजय पाटील, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 90, नेरुळ, डॉ. डि वाय. पाटील हॉस्पिटलसमोर अनेक वेळा अपघात होत असतात. तरी या ठिकाणी गतिरोधक बसविणे. | 36<br>सप्टेंबर | 1237<br>21/09/2016 | मंजूर |
| 26. | श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 45, मधील "चिकणेश्वर" बस डेपो मधील सार्वजनिक शौचालयाची दुरावस्था झाल्याने त्याच ठिकाणी त्या शौचालयाची नुतनीकरण करणे. | 37<br>सप्टेंबर | 1238<br>21/09/2016 | मंजूर |
| 27. | श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 45, मधील सर्व उद्यानामध्ये "स्ट्रीट लाईट" विद्युत दिवे अतिशय कमी प्रमाणात आहेत. तरी प्रत्येक उद्यानामध्ये "पथदिवे" नवीन बसविणे. | 38<br>सप्टेंबर | 1239<br>21/09/2016 | मंजूर |
| 28. | श्रीम. संगीता संदीप म्हात्रे, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 45, से. 3 मधील "बहुउद्देशिय भुखंड" महीला वस्तीगृहासाठी राखीव आहे. सदर ठिकाणी वस्तीगृहाची निर्मिती लवकरात लवकर करणे. | 39<br>सप्टेंबर | 1240<br>21/09/2016 | मंजूर |
| 29. | श्रीम. भारती रविकांत पाटील, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 44 मधील सर्व रस्ताचे दुरावस्था झालेली आहे व गेली अनेक वर्ष त्याचे डांबरीकरणही झालेले नाही. तरी आपण योग्य ती पहाणी करुन सर्व रस्ताचे डांबरीकरण करणे. | 40<br>सप्टेंबर | 1241<br>21/09/2016 | मंजूर |
| 30. | श्रीम. भारती रविकांत पाटील, यांजकडून :-<br><br>भाग क्र. 44, से.15, 16 व 7 मधील असणाऱ्या सर्व मलनि:स्सारण वाहिन्या खुपच खराब झालेल्या आहेत, तरी त्या नव्याने टाकणे. | 41<br>सप्टेंबर | 1242<br>21/09/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 31. | श्रीम. भारती रविकांत पाटील, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 44 मधील असणाऱ्या शिवाजीराव पाटील मैदानातील सभा मंडपाची अत्यंत दुरावस्था झालेली असून तेथे बहुउद्देशिय इमारत नव्याने बांधणे. | 42<br>सप्टेंबर | 1243<br>21/09/2016 | मंजूर |
| 32. | श्रीम. शिल्पा सुर्यकांत कांबळी, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 88, से.11 येथील टॅक्सीस्टॅड अंतर्गत असलेले गटर व जागेची स्थिती अत्यंत दयनीय आहे. तरी तिथे गटर दुरुस्ती तसेच पेव्हर ब्लॉक बसवावे अथवा त्या ठिकाणी डांबरीकरण करणे. | 43<br>सप्टेंबर | 1244<br>21/09/2016 | मंजूर |
| 33. | श्रीम. शिल्पा सुर्यकांत कांबळी, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 88, मधील जय भवानी चौक, से. 3, येथील (नेरुळ बस डेपो लगत) येथील उदयानाचे सुशोभिकरण करणे. | 44<br>सप्टेंबर | 1245<br>21/09/2016 | मंजूर |
| 34. | श्रीम. शिल्पा सुर्यकांत कांबळी, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 88, मधील, सेक्टर 03, महानगरपालिकेच्या बी विभाग नेरुळ कार्यालयाचा भूखंड क्रमांक 20 सिडकोकडुन हस्तांतरीत करुन तेथे महानगरपालिकेचे व्यवस्थित बी विभाग कार्यालय बनवणे. | 45<br>सप्टेंबर | 1246<br>21/09/2016 | मंजूर |
| 35. | श्रीम. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-<br><br>. 56, कोपरीगाव येथील शाळा क्र. 30 ची दुरुस्ती व सुधारणा करणे. | 46<br>सप्टेंबर | 1247<br>21/09/2016 | मंजूर |
| 36. | श्रीम. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 56, कोपरीगाव येथील भुखंड क्र. 4A, प्रोग्रेसिव्ह व्हिला व भुखंड क्र. 4B, समोरील रस्ते, गटर व पदपथ बांधणे. | 47<br>सप्टेंबर | 1248<br>21/09/2016 | मंजूर |
| 37. | श्रीम. उषा पुरुषोत्तम भोईर, यांजकडून :-<br><br>क्र. 56, कोपरीगाव येथील दिनानाथ शिवराम भोईर ते नवनाथ काशिनाथ भोईर यांच्या घरापर्यंत पदपथाची व गटारांची सुधारणा करणे. | 48<br>सप्टेंबर | 1249<br>21/09/2016 | मंजूर |

| अ. क्र. | नगरसेवकांची नांवे आणि संक्षिप्त विषय | विषय क्र. व महिना | ठराव क्र. व दिनांक | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| 38. | श्रीम. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 94, नेरुळ, सेक्टर 10 येथे महीलांच्या संरक्षणासाठी व वाढत्या चोरींना आळा बसविण्यासाठी सी.सी.टी.व्ही (CCTV) कॅमेरे अतिशय आवश्यकता असुन ते लवकरात लवकर लावणे. | 49<br>सप्टेंबर | 1250<br>21/09/2016 | मंजूर |
| 39. | श्रीम. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 94, नेरुळ, सेक्टर 10 येथील एन.एल.1बी, चाळ क्र. 62 ते 73 व कपिलवस्तुच्या आवारातील जुनी सिवरेज लाईन ही कमी व्यासाची असून ती लाईन बदलून मोठया व्यासाची टाकणे. | 50<br>सप्टेंबर | 1251<br>21/09/2016 | मंजूर |
| 40. | श्रीम. श्रध्दा साजुराम गवस, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 94, नेरुळ, सेक्टर 10, नवी मुंबई येथील एखादी सदनिका धारक व्यक्ती मयत झाली तर तिच्या नातेवाईकांच्या नावे मालमत्ता कर व पाणीबिल करण्यासाठी जी फि आकारली जाते. | 51<br>सप्टेंबर | 1252<br>21/09/2016 | मंजूर |
| 41. | श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 27, अंतर्गत तळवली नाका बहुउद्देशिय इमारतीमधील नागरी आरोग्य केंद्रमध्ये प्रयोग शाळाकरीता साहित्य व प्रयोगशाळा तंत्रज्ञ व मदतनीस देणे. | 52<br>सप्टेंबर | 1253<br>21/09/2016 | मंजूर |
| 42. | श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 27, अंतर्गत रासायनिक धुरीकरण व ऑईल फवारणी कामगार नागरी आरोग्य केंद्र नोसिल नाका करीता वेगळे करुन देणे. | 53<br>सप्टेंबर | 1254<br>21/09/2016 | मंजूर |
| 45. | श्री. लक्ष्मीकांत नामदेव पाटील, यांजकडून :-<br><br>प्र. क्र. 27, अंतर्गत नोसिल नाका येथील नागरी आरोग्य केंद्रामध्ये सुरक्षा रक्षक म्हणून स्थानिक मुलांचीच नेमणूक करणे. | 54<br>सप्टेंबर | 1255<br>21/09/2016 | मंजूर |

सही/-
महापालिका सचिव
नवी मुंबई महानगरपालिका